**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक 06/08/2025**

आरोपी लोकसेवक गोविंद रामचंद्र सबनवाड वय 54 वर्ष ,पद. तलाठी (वर्ग-3),नेमणूक,सजा कार्यालय अंचलगाव, ता. वैजापूर, जि, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचे आईचे नावे हक्कासोड प्रमाणपत्रावरून फेर घेऊन सातबारा उता-यावर नोंद घेण्यास नोटीस काढण्यासाठी स्वतः करिता तक्रारदार यांच्या कडे 2000/- रुपये लाचेची मागणी करून आलोसे यांनी पंच समक्ष स्विकारल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे शिऊर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | **आरोपी लोकसेवक** - श्री. गोविंद रामचंद्र सबनवाड वय 54 वर्ष ,पद. तलाठी नेमणूक,सजा कार्यालय अंचलगाव, ता. वैजापूर, जि, छत्रपती संभाजीनगर, रा.सुकणी तालुका उदगीर जिल्हा. लातूर,ह. मु.रा.डिसुझा रेसिडेन्सी, ताराराम सोसायटी, पडेगाव, छत्रपती संभाजीनगर. (वर्ग 3 ) |
| लाच मागणी रक्कम | 2,000/- (दोन हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 2,000/- (दोन हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहाय्यक सापळा अधिकारी | श्री. बाळासाहेब शिंदे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर<br>श्री. वाल्मीक कोरे , पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे मौजे बाभुळतेल ता. वैजापूर शिवारात गट क्रमांक 242 मध्ये शेत जमीन समाईक क्षेत्र 52 आर होते. सदर वडिलोपार्जित क्षेत्रावरील हक्क सोड प्रमाणपत्रावरून फेर घेऊन उता-यावर नाव लावण्यासाठी तक्रारदार यांचे आईचे नावाने दिनांक 18/09/2023 रोजी जमिनीचे कागदपत्राची फाईल आलोसे यांच्याकडे दिली होती. दिनांक 06/08/2025 रोजी तक्रारदार यांनी आलोसे यांना भेटून जमिनीची फेर मध्ये नोटीस काढण्यासाठी विचारपूस केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे 2000 रुपयाची मागणी केली असल्याची तक्रार ला.प्र. वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्राप्त झाली होती. |
| थोडक्यात माहिती | दिनांक 06/08/ 2025 रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची शासकीय पंच समक्ष आलोसे यांच्याकडे तक्रारदारास पाठवून पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे फेर घेऊन सातबारा उता-यावर नाव नोंद घेण्यासाठी नोटिस काढण्यासाठी 2000/- हजार रुपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लाच मागणी पडताळणी नंतर दिनांक 06/08/2025 रोजी शासकीय पंच समक्ष लोणी खुर्द तालुका वैजापूर, येथील झेरॉक्स दुकानात सापळा कारवाई आजमावली असता आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडून 2000/- रुपयांची लाचेची रक्कम पंचा समक्ष स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.<br>सबब आलोसे यांच्या विरोधात पोलीस ठाणे शिऊर, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण ) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असुन नमुद आरोपी लोकसेवक यांना अटक करुन तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत करण्यात येत आहे.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे. |

सदर कार्यवाही श्रीमती माधुरी कांगणे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक तथा पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश ह. नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक, श्री. बाळासाहेब शिंदे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक, श्री.वाल्मीक कोरे, पोलीस हवलदार भिमराज जिवडे, राजेंद्र जोशि, पोलीस अंमलदार डोंगरदिवे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1) spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लिकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923247986

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986

सुरेश ह.नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर